**Newspaper:** Maharashtra Times

**Date:** 23rd July 2025

**News about the conduct of TEDxRAPodarCollege in the College**




# पोदारमध्ये रंगला टेडएक्स

गायत्री देव, पोदार कॉलेज

**'द चेंज वी चूज' विषयावर प्रेरणादायी विचार**

वाणिज्य शाखेतील विविध अभ्यासक्रमांसाठी अग्रणी आणि पहिल्या पसंतीचे असलेल्या माटुंग्याच्या **पोदार वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयामध्ये** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. नुकताच महाविद्यालयात 'द चेंज वी चूज' या विषयावर एक टेडएक्स कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

पोदार महाविद्यालयात प्राचार्या डॉ. विनिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम नेहमीच होतात. टेडएक्स शिक्षक विभाग प्रमुख सुदर्शना सायकिया आणि डॉ. वृषाणी कणेरी यांच्या संकल्पनेतून या शैक्षणिक वर्षातील पहिला टेडएक्स कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचा विद्यार्थी नील बहिरा याने पावसाचं पाणी पिण्यायोग्य करणं किंवा डिजिटल बिलिंग सोल्युशन अशा विविध प्रयोगांतून साध्या समस्यांकडे डोळसपणे पाहण्याची गरज दाखवून दिली. 'समावेशन' या दृष्टिहिन विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या संस्थेद्वारे संदेश भिंगार्डे यांनी कशा प्रकारे 'बदल' ही संकल्पना ध्वनित केली, हा प्रवास ऐकणं विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलं. त्याशिवाय, भारताचे सौरपुरुष म्हणून ओळखले जाणारे डॉ. चेतन सिंह सोलंकी यांनी शाश्वतता आणि पर्यावरणीय जबाबदारी, याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाश्वतता ही जीवनशैलीतून घडत असते, त्यासाठी मोठ्या बदलांची गरज नाही, असं त्यांनी नमूद केलं. कार्यक्रमाच्या अखेरीस विजय पाखरे आणि निनाद कदम यांचे 'कला आणि कथा' हे अनोखं सादरीकरण पार पडलं.